| MHKO200000322020 | **<u>नियमीत दिवाणी दावा क्रं. ५/२०२० मधील नि.क्रं. ४० खालील आदेश</u>**<br><br>**<u>श्री.तुकाराम देवबा जाधव वगैरे विरुध्द श्री.सुनिल दिनकर पाटील वगैरे</u>** |
|---|---|

वादी यांनी सदरचा दावा कायम मनाईकरीता दाखल केला आहे.

**०२.** प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ व स्पेसिफिक रिलिफ ॲक्ट कलम ४१ वादी यांनी वाटपाची मुख्य दाद तसेच प्रतिवादीची मागणी केलेल्या खरेदीपत्राबाबत देखील दाद मागणी केलेली नाही त्यामुळे प्रस्तुतचा दावा चालणेस पात्र नसलेने तो नामंजूर करणेची विनंती केली आहे. प्रस्तुत दाव्यात वादीनी दावा मिळकतीबाबत आकाराम, सखाराम व तुकाराम यांचे दरम्यान आजअखेर कधीही मोजून मापून अगर कोणत्याही प्रकारे वाटप झाले नव्हते व नाही. दावा मिळकतीमधील वादीचे पूर्व हक्कदारांपासून समाईक कब्जेवहिवाट आहे असे कथन केले आहे. तसेच दावा मिळकतीमधील क्षेत्र प्रतिवादीनी खरेदी घेतले असलेचे कथन केले आहे. तसेच दावा मिळकतीचा ७/१२ उतारा दाव्यासोबत वादीनी जोडलेला असून त्यामध्ये देखील प्रतिवादी यांच्या नावाच्या नोंदी मालक व कब्जेदार म्हणून नमूद आहे. परंतु, वादीनी प्रस्तुत दाव्याच्या कामी केवळ प्रतिवादीनी दावा मिळकतीत बांधकाम करु नये अशी मनाईची दाद मागणी केली आहे.

**०३.** वास्तविक वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकतीचे सरस–निरस मानाने वाटप झालेले नाही. असे असताना वादी यांनी दाव्याच्या कामी वाटपाची मुख्य दाद मागणी केलेली नाही. तसेच प्रतिवादीची मागणी केलेल्या खरेदीपत्राबाबत देखील दाव्याबाबत कोणतीही दाद मागणी केलेली नाही. त्यामुळे सदरच्या मुख्य दादी वगळून केवळ मनाईसाठी दाखल केलेला सदरचा

दावा कायदयातील तरतुदीप्रमाणे चालणेस पात्र नसलेने प्रथमदर्शनीच नामंजूर होणेस पात्र आहे. त्यामुळे प्रतिवादी यांचा सदरचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

**०४.** वादी यांनी त्यांचे म्हणणे नि. ४३ वर दाखल केले आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांचा सदरचा अर्ज चुकीचा, बेकायदीर व कायद्यातील तरतुदींचे विरुध्द असल्याने चालणेस पात्र नाही. प्रतिवादी यांनी सदर अर्ज प्रस्तुत दाव्याची चौकशी लांबवण्यासाठी दाखल केला असल्याने सदरचा अर्ज फेटाळणेस पात्र आहे. वादी यांनी दावा हा मौजे पणोरे येथील भू.गट क्रं. १० बाबत कायम मनाई करीता दाखल केला आहे. सदर दाव्यात वादीनी प्रस्तुत प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीमध्ये मोक्याच्या ठिकाणी बेकायदेशीरपणे बांधकाम करु नये अशा स्वरुपाची मनाईची दाद मागितली आहे. वादी यांचा तुर्तातुर्त मनाई अर्ज मंजूर झाला असून सदर आदेशा विरुध्द प्रतिवादी यांनी मे. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर यांचे न्यायालयात दिवाणी किर. अपिल क्रं. ५५/२०२० चे अपिल गुणदोषावर चालून ते फेटाळण्यात आले आहे. त्यामुळे वादी यांनी केलेल्या दाव्याच्या अनुषंगाने प्रतिवादींनी दावेची चौकशी सुरु झाली असताना सदरचा अर्ज केवळ कामाची चौकशी लांबविण्याच्या उद्देशाने सदरचा अर्ज दाखल केला असल्याने तो फेटाळणेस पात्र आहे.

**०५.** वादी यांनी त्यांचे सरतपासाचे शपथपत्र नि.क्रं.३७ वर दाखल केले असून त्यावर प्रतिवादींविरुध्द 'उलटतपास नाही' असा आदेश पारीत झाला आहे. त्यामुळे वादी यांनी सदरचा दावा चालवणेस कधीही टाळाटाळ केलेली नाही. प्रतिवादी यांनी त्यांचे नि.क्रं.१८ चे कैफियतमध्ये त्यांनी दावा मिळकतीपैकी ५ आर. क्षेत्राची मालकी खरेदीपत्राने आलेबाबत नमुद केले आहे. सदरचे खरेदीपत्र कागद यादी नि.क्रं.१७/१ वर दाखल केले आहे. त्याचे

अवलोकन करता प्रस्तुत प्रतिवादींनी दावा मिळकतीपैकी समाईक क्षेत्र खरेदी केल्याचे स्पष्टपणे नमुद केले आहे. कायद्यातील प्रचलित तरतुदीनुसार खरेदीदाराने मुळ मालकांकडून समाईक क्षेत्र / अविभक्त क्षेत्र खरेदी केले असल्यास प्रस्तुत खरेदीदाराने मुळ मालकांविरुध्द वाटपाचा दावा दाखल करणे अभिप्रेत आहे. परंतु प्रतिवादी यांनी मुळ मालकांविरुध्द वाटपाचा दावा दाखल करुन समाईक क्षेत्रापैकी तथाकथित खरेदी क्षेत्र वाटप/विभक्त करुन घेतलेले नाही. त्यामुळे प्रस्तुत कामी मुळ मालकांनी वाटपाचा दावा दाखल करणेचा प्रश्नच उद्भवत नाही. तसेच वादी यांनी दाखल केलेला दावा हा प्रतिवादींनी दावा मिळकतीपैकी मोक्याच्या ठिकाणी बांधकाम करु नये म्हणून मनाईचा दावा दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी बांधकाम करण्यापूर्वी दावा मिळकतीपैकी खरेदीपत्राने आलेल्या मालकीचे क्षेत्र मुळ मालकांकडून विभक्त करुन घेणे प्रतिवादीवर बंधनकारक होते परंतु प्रतिवादी यांनी तसे केले नाही.

०६. वादी यांनी त्यांचे कथनापुष्ठयर्थ मा.उच्च न्यायालय, मुंबई १) **रामंदास विरुध्द सिताबाई वगैरे ए.आय.आर.२००९ (५) मुंबई आर.१२४ अपेक्स कोर्ट**. २) **बाई शेवंतीबाई विरुध्द जनार्दन आर वारीक, ए.आय.आर.१९३९ बॉम्बे ३२२ मुंबई उच्च न्यायालय** हे न्यायनिवाडे अवलोकनार्थ कथन केले आहेत. सदर न्यायानिवाडयांमध्ये खरेदीदाराने मुळ मालकांकडून दावा मिळकतीपैकी अविभक्त /समाईक क्षेत्र खरेदी केला असलेस सदर खरेदीदारास केवळ मालकी येऊ शकते परंतु खरेदीदाराने मुळ मालकांकडून वाटप करुन हिस्सा तुटक करुन घेतले खरेदी खरेदीदारास दावा मिळकतीपैकी कोणत्याही विशिष्ट भूभागावार अगर मोक्याच्या ठिकाणी आपला अधिकार सांगता येणार नाही अशा आशयाचे अनुमान काढले आहेत.

०७. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. सदर दाव्यातील कथनांचे अवलोकन करता असे निदर्शनास येते की, सदर दावा हा कायम मनाईसाठी

दाखल केला आहे. प्रतिवादींच्या मते प्रस्तुत दाव्यात वादीनी वाटपाची अथवा प्रतिवादींनी केलेल्या खरेदीपत्रा विषयी मुळ दाद मागणी केली नसल्याने तो दावा सकृत दर्शनी चालण्यास अपात्र आहे. त्यामुळे वादी यांच्या दाव्यातील विनंतीमध्ये जी वादीने मागणी केली आहे त्या अनुषंगाने दावा दाखल केला आहे. दाव्यात अजुन पुरावा सुरु झालेला नाही त्यामुळे सदरच्या बाबी हया पुराव्यानिशी सिध्द होणार आहेत व त्यासाठी बराच कालावधी लागणार आहे.

**०८.** दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ या तरतुदीचे अवलोकन केले असता वादीला दावा दाखल करण्यास कारण घडले असल्याचे प्रस्तुत दाव्यावरुन निदर्शनास येते. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणे उचित होईल. त्यामुळे वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

VAISHALI AMOL LAVAND-KOKATE

Digitally signed by VAISHALI AMOL LAVAND-KOKATE
Date: 2025.07.24 18:10:36 +0530

( व्ही.ए.लावंड–कोकाटे )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कळे–खेरीवडे.

कळे–खेरीवडे
दि.२४.०७.२०२५.